## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : के.आर-५३/२०२०

अपिलार्थी, श्रीमती शांता नागनाथ दामोदरे,
त्रिवेणी नगर,जवळ २७४ ए ब्लॉक ,
कुर्ला कॅम्प रोड.००४ ४२१ - उल्हासनगर ,

रा.मा.आ. / को.ख.
निर्णित :- 12,13, (SP)
दिनांक :-02/03/2023

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा शिक्षण अधिकारी,
शिक्षण विभाग.मिरा भाईंदर महानगरपालिका ,

द्वितीय अपील अर्ज सुनावणीचा दिनांक : १५/१०/२०२०

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ४.१०.२०१९ | ----- | ७.११.२०१९ | ---- |

अपिलार्थीस दि. ४.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली पतीच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणा-या कुटुंब निवृत्तीवेतनाचा अनियमितपणा तसेच निवड श्रेणीची रकमेबाबतचा खुलासा, इतर रकमाबाबत माहिती मिळणेबाबत, या विषयाची माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दि. ३.१.२०२० रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक २०२०/१०/१५ रोजी गुगल मिट (Google meet ) ॲप द्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. दिपाली जोशी ,शिक्षणाधिकारी , आणि विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी श्री .संभाजी वाघमारे ,उपायुक्त) शिक्षण ,(मिरा भाईंदर महानगरपालिका हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीचे प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक ४.१०.२०१९च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही .यास्तव दिनांक ७.११.२०१९ रोजी प्रथम अपील दाखल केले .

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे नमूद केले की, त्यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती/उत्तर कळविल्याचे दिसून येत नाही .वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम (१) ७ अन्वये ३० दिवसांत माहिती पुरंविणे अथवा नाकारणे आवश्यक होते .परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (१) २० अन्वये शास्तीच्या कारवाईस पात्र आहेत .तसेच प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत म्हणून त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे .

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. उर्मिला पारधे, शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून उपलब्ध सर्व माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क अपिलार्थीस पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

संगणक-११

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. उर्मिला पारधे, शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ४.१०.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३०दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम. मृदुला अंडे, उपायुक्त) शिक्षण ,(मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थीने दिनांक ७.११.२०१९अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के.आर.५३/२०२० निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(के.एल.बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १५ ऑक्टोबर,.२०२

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त )शिक्षण(
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका.

२. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम. मृदुला अंडे ,उपायुक्त) शिक्षण,(
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका.
-यांना प्रत विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी श्री. संभाजी वाघमारे ,उपायुक्त) शिक्षण ,(
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत रवाना.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. उर्मिला पारधे ,शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका.
-यांना प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. दिपाली जोशी ,शिक्षणाधिकारी
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत रवाना.

अपिल क्रमांक : के.आर- ५३/२०२०
अपिलार्थी, श्रीम.शांता नागनाथ दामोदरे,
**सुनावणी दिनांक १८.११.२०२२** ( In Continuation of order dt.१५.१०.२०२०)

विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

या प्रकरणी या आयोगाद्वारे दि.१५.१०.२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

*१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. उर्मिला पारधे, शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून उपलब्ध सर्व माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क अपिलार्थीस पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५दिवसांत पाठवावे.*

*२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. उर्मिला पारधे, शिक्षणाधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ४.१०.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत२० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात*

*येऊ नये, याचा लेखी खुलासा ३०दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.*

3. *तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम. मृदुला अंडे, उपायुक्त (शिक्षण) मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलार्थीने दिनांक ७.११.२०१९अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.*
4. *उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के.आर.५३/२०२० निकाली काढण्यांत येत आहे.*

सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, आतातपर्यंत अपिलार्थींना माहिती मिळाली नाही व याबाबत त्यांनी तक्रार अर्ज दाखल केला आहे .यासंबंधीची सुनावणी तक्रार आर्जाच्या सुनावणीच्या वेळी घेण्यात येईल .

तसेच या प्रकरणी या आयोगाद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांना खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. आतापर्यंत त्यांचा खुलासा प्राप्त झालेला नाही .संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना खुलासा सादर करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे .या कारणामुळे सदर प्रकरणावर संबंधित जन माहिती अधिकारी यांचा खुलासा प्राप्त झल्यानंतर सुनावणी घेण्यात येईल.

## आदेश

आयोगाच्या दि.१५.१०.२०२० रोजीच्या आदेशानुसार संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना खुलासा सादर करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे. त्यानुसार त्यांनी त्यांचा खुलासा आयोगाकडे सादर करावा .

सही-/
(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ नोव्हेंबर,२०२२ .

**अपिल क्रमांक : के.आर- ५३/२०२० मधील तक्रार क्र.१०१/२०२१**
**अपिलार्थी, श्री. शांता नागनाथ दामोदरे.**
**सुनावणी दिनांक ६.१.२०२३ (In continuation of order dt. १८.११.२०२२)**

## विवेचन

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपिलावरील १५.१.२०२१ रोजीच्या तक्रारीवर आज दिनांक ६.१.२०२३रोजी सुनावणी घेण्यात आली .

सदर सुनावणीस तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, त्यांना आयोगाच्या आदेशानंतर ३९५दिवसांनी म्हणजेच दि.३.११.२०२० रोजी चुकीची, अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे. तसेच त्यांनी सुनावणीच्या वेळी असेही सादर केले की, माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती मिळाली नाही. तसचे माहिती अर्जातील मुद्दा क्र. ,७ uराज्य *माहिती आयोग, कोंकण खंडपीठ KR ३२६८/२०१४ यांच्या निकालामार्फत मिळणा-या नुकसान भरपाई बाबतची दिरंगाईची माहिती, या दिरंगाईबाबत कार्यवाही पात्र असलेल्या अधिका-याचे नाव, पद, तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका त्यावर दिरंगाईबाबत केलेली कार्यवाहीची प्रत.त* बाबतची माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. माहिती अर्जातील इतर मुद्दयांबाबत जन माहिती अधिकारी यांनी दि.३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती चुकीची आहे.

विद्यमान ज़न माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, त्यांनी आयोगाच्या आदेशानंतर दि.३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तक्रारकर्ता यांचे सेवापुस्तक दि.४.५.२०१३ रोजी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना पाठविले आहे. त्याबाबतची पोच उपलब्ध आहे. म्हणजेच या ठिकाणी कोणतीही माहिती येथे दडवून ठेवण्यात आलेली नाही.

सुनावणी वेळेचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारांत घेता असे निदर्शनास आले की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतर दि.३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे तक्रारकर्ता यांनी सेवापुस्तकाची प्रत

मिळण्याची विनंती केली आहे. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी तक्रारकर्ता यांचे सेवापुस्तक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे दि.४.५.२०१३ रोजी पाठविल्याबाबतची पोच त्यांनी सुनावणी दरम्यान आयोगास सादर केली असल्याने, तक्रारकर्ता यांचे सेवापुस्तक जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. या कारणास्तव,सेवापुस्तकाची नेमकी सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांची या प्रकरणी साक्ष घेणे उचित होईल.

तसेच माहिती अर्जातील मुद्दा क्र. ७ बाबत, दि. ४.९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता श्रीमती. शांता नागनाथ दामोदरे यांना दिलेल्या पत्रामध्ये नुकसान भरपाई देण्यासाठी जबाबदार असणा-या व्यक्तींचे नाव दिल्याचे दिसून येते. दि.३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना इतर मुद्दयांबाबतची दिलेली माहिती कशी चुकीची आहे याबाबत तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांना सुनावणी दरम्यान विचारणा केली असता याबाबत ते स्पष्टपणे नमूद करू शकले नाहीत. यावरुन असे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. सबब, मुद्दा क्र. १ वगळता इतर मुद्दयांबाबत तक्रारीमध्ये काही तथ्य नाही. या प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.९.२.२०२३ रोजी सकाळी १२:५०वाजता घेण्यात येईल व त्या दिवशी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी ,शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग ,जिल्हा परिषद ,ठाणे यांची उपस्थिती अनिवार्य राहिल.

सही/-
(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २०२३ ,जानेवारी ०६ .

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका ,
डॉ. बाबासाहेब आंबडेकर भवन) ,नगर भवन),
मांडली तलाव, दुसरा मजला ,भाईंदर) प ,(ता. जि .ठाणे.१०१ ४०१

२. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे ,
स्टेशन रोड, शिवाजी पथ ,जांभळी नाका, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

## अपिल क्रमांक : के.आर- ५३/२०२० मधील तक्रार क्र.१०१/२०२१
## अपिलार्थी, श्री. शांता नागनाथ दामोदरे.
## सुनावणी दिनांक ०९.०२.२०२३ (In continuation of order dt. ०६.०१.२०२३)

विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सहा.जन माहिती अधिकारी तथा प्र.प्रशासकिय अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण), मिरा भाईंदर महानगरपालिका अनुपस्थित आहेत(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपशिक्षणधिकारी (प्राथ.) व जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी मुळ सेवा पुस्तिका मिरा भाईंदर महानगरपालिकेद्वारे दि.०४.०५.२०१३ रोजी शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे हस्तांतरित केलेली होती. त्याबाबतचे पुरावे आयोगासमोर सादर करण्यात आलेले आहेत. तसेच अपिलार्थी यांनी सादर केलेला त्यांचा लेखी युक्तीवाद अभिलेखावर घेण्यात आलेला आहे. आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सेवा पुस्तिकेची सद्यस्थिती बघण्याकरिता वेळेची मागणी केलेली आहे.

त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.०४.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०२३ .

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

---

**अपील क्रमांक के.आर-५३/२०२० मधील तक्रार क्र.१०१/२०२१**

**अपिलार्थी – श्रीमती शांता नागनाथ दामोदरे**

**सुनावणी दिनांक : १३.०४.२०२३ ( In Continuation of order dt 09.02.2023 )**

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तर, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

२. सदर प्रकरणी अपिलार्थींच्या द्वितीय अपील क्र. ५३/२०२० च्या अनुषंगाने दि.१५.१०.२०२० अन्वये दिलेल्या आदेशासह अपील निकाली काढण्यात आले होते. परंतु, सदर आदेशानुसार प्राप्त झालेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी मिळाली आहे असे नमूद करुन तक्रारकर्ता यांनी दि.१५.०१.२०२१ रोजी तक्रार अर्ज सादर केला.

३. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने (तक्रार क्र.१०१/२०२१) दि. ०६.०१.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांनी आयोगाच्या आदेशानंतर दि. ०३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तक्रारकर्ता यांचे सेवापुस्तक दि.०४.०५.२०१३ रोजी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना पाठविली आहे. त्याबाबतची पोहोच उपलब्ध आहे. म्हणजेच या ठिकाणी कोणतीही माहिती दडवून ठेवण्यात आलेली नाही.

या कारणास्तव सेवापुस्तकाची नेमकी सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांची या प्रकरणी साक्ष घेणे उचित राहिल, असे निर्देश देवून सुनावणी पुढे ढकलण्यात आली.

त्यानंतर दि.०९.०२.२०२३ च्या पुढील सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) व जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी असे सादर केले की, सदर प्रकरणी मुळ सेवापुस्तिका मिराभाईंदर महानगरपालिकेद्वारे दि.०४.०५.२०१३ रोजी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे हस्तांतरीत केलेली होती. त्याबाबतचे पुरावे आयोगासमोर सादर करण्यात आले. तसेच, अपिलार्थी यांचा लेखी युक्तीवाद अभिलेखावर घेण्यात आला. सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी सेवापुस्तिकेची सद्य:स्थिती बघण्याकरिता वेळेची मागणी केली.

त्याप्रमाणे सदर सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांनी दि. २८.०२.२०२३ चे शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, मिरा-भाईंदर म.न.पा. यांना लिहिलेले पत्र सादर केले. त्यात असे नमूद केले आहे की, उपरोक्त संदर्भिय विषयान्वये संदर्भ क्र.१ अन्वये कै. नागनाथ गणपत दामोदरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी निवडश्रेणी मिळणेबाबत मागदर्शन या कार्यालयाकडे मागविण्यात आले आहे. तथापि, कै.दामोदरे से.नि.मुख्याध्यापक यांची संदर्भीय नस्ती आढळून येत नव्हती. मा. राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार सदर नस्तीचा पुनश्च: शोध घेण्यात आला असता नस्ती सद्य:स्थितीत आढळून आली आहे. सेवेत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ /निवडश्रेणीचा लाभ देणेकरिताच्या तरतुदी संदर्भ क्र.३, ४, ५,६ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या आहेत. कै.नागनाथ गणपत दामोदरे से.नि.मुख्याध्यापक हे आपल्या कार्यक्षेत्रात असलेल्या शाळेमधुन सेवानिवृत्त झालेले आहेत. सबब, प्रचलित नियम व संदर्भीय शासन निर्णयात नमूद केलेल्या तरतुदी विचारात घेऊन कै. दामोदरे से.नि.मुख्याध्यापक यांना निवडश्रेणीचा लाभ देण्याबाबत नियमानुसार आपलेस्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

..२/-

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मिरा-भाईंदर म.न.पा. यांनी असे विषद केले की, तक्रारकर्ता यांना सेवापुस्तिकेची माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

तथापि, तक्रारकर्ता यांनी त्यांना माहिती मिळण्यामध्ये मानसिक त्रास सहन करावा लागला व खर्च झाला आहे. म्हंणून त्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली.

४. या प्रकरणात असे निदर्शनास आले की, तक्रारकर्ता यांना मुळ अपील आदेशानुसार माहिती देण्याची कार्यवाही झालेली आहे. तसेच, सदर कार्यवाही करण्यास विधानसभा निवडणूका २०१९ ची कामे सुरु असल्याने म.न.पा.च्या शिक्षण विभागातील जन माहिती अधिकारी असलेले कर्मचारी हे निवडणुकाच्या कामामध्ये व्यस्त असल्याने तसेच तक्रारकर्ता यांचे मुळ सेवापुस्तक अभिप्रायासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आल्याने व त्यांच्याकडून ते प्राप्त झाल्यानंतर अंतिम: माहिती दिली आहे. यामुळे झालेला विलंब हा जाणुनबुजून केलेला नव्हता. अथवा, तक्रारकर्त्यास त्रास देण्याचा उद्देश नव्हता. त्यामुळे या ठिकाणी तक्रारकर्त्याची नुकसान भरपाई मागण्याची विनंती विचारात घेता येणार नाही. सबब, आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**उपरोक्त विवचेनासह तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १४.१२.२०२३**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**